वीर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी
मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा
पुनर्वसन कर्ज मंजर करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुकर्ज-२११५/प्र.क्र.३५/टेक्स-१ (अ)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
तारीख : ०८ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय, कृषी व सहकार विभाग क्र.८४८५/सीआर २६२/८-सी, दि.२६.३.१९८७
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि- २१०८/प्र. क्र. १८६(७)/टेक्स-१(ब), दिनांक १.१२.२००८.
३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि- ११०९/प्र.क्र.६०/टेक्स-१ (ब), दिनांक ३१.३.२०१०.
४. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. पुकर्ज२११३/प्र. क्र.४७/टेक्स-१(अ), दिनांक २९.३.२०१४.
५. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे पत्र क्र.कार्या.६(१)/सूतगि/२७८९/१७, दि.१८.३.२०१७.

प्रस्तावना :-

शासनाच्या संदर्भाधीन दिनांक २६.३.१९८७ च्या निर्णयानुसार निर्धारित केलेल्या अटी व शर्तीनुसार सहकारी सूतगिरण्यांना पुनर्वसन कर्ज मंजूर करण्यात येते. गिरण्यांना वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या थकीत कर्जाची परतफेड करणे व इतर आर्थिक सहाय्य करण्याची ही योजना आहे.

वीर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा ही सहाव्या पंचवार्षिक योजना काळात उभारणी केलेली सहकारी सूतगिरणी आहे. गिरणीने दि.२०.४.१९८९ रोजी उत्पादनास २४९६० चात्यांवर सुरुवात केली असून सद्यस्थितीत गिरणी ऑक्टोबर, २०१६ पासून बंद आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रातील मंदीमुळे व तत्कालीन वाढीव व्याज दराच्या बोजामुळे गिरणी आर्थिक अडचणीत आहे. गिरणीने थकीत केलेल्या वित्तीय संस्थांकडील देणी भागविण्याकरीता गिरणीला शासकीय कर्ज यापूर्वी देण्यात आहे. सदर कर्जाची गिरणीने परतफेड केलेली नाही. सदर कर्जाची परतफेड करण्यासाठी सूतगिरणीची उत्पादन क्षमता व सूताचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. त्यामुळे गिरणीतील जुनी यंत्रसामुग्री बदलून अद्ययावत यंत्रसामुग्री घेण्यासाठी गिरणीस पुनर्वसन कर्जाची आवश्यकता आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई यांनी गिरणीचे पुनर्वसन व अंशत: यंत्रसामुग्रीचे नुतनीकरण याकरिता रु.९९९.५२ लाख रक्कमेचा प्रकल्प अहवाल तयार करुन दिला आहे. प्रस्तुत

रु.९९९.५२ लाख या प्रकल्प अहवाल किंमतीच्या अनुषंगाने रु.८७७.८६ लाख पुनर्वसन कर्ज यपूर्वीच या सूतगिरणीस वितरीत करण्यात आले आहे. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांना अहवाल व महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई यांचा अहवाल लक्षात घेता वीर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी, मलकापूर, जि.बुलढाणा या गिरणीची जुनी यंत्रसामुग्री बदलून नवीन यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी गिरणीला पुनर्वसन कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. आता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून या सूतगिरणी पुनर्वसन कर्ज उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

वीर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा या सूतगिरणीस जुनी यंत्रसामुग्री बदलून नवीन यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी रु.१,२१,६६,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एकवीस लाख सहासष्ट हजार फक्त) इतकी रक्कम अंतिम व उर्वरित पुनर्वसन कर्ज म्हणून या सूतगिरणीस यापूर्वी शासनाने मंजूर केलेल्या बिनव्याजी कर्जाची थकित रु.२२,२४,०००/- इतकी रक्कम या शासन निर्णयान्वये प्राप्त होणाऱ्या पुनर्वसन कर्ज रु.१,२१,६६,०००/- या रक्कमेतून एकरक्कमी परतफेड करण्याच्या अटीच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. शासन निर्णय, कृषि व सहकार व विभाग दि.२६.३.१९८७ मधील अटी व शर्तींच्या अधिन राहून (सोबत परिशिष्ट एक) तसेच खालील अटी शर्तीच्या अधिन राहून सदर पुनर्वसन कर्ज मंजूर करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शासनने वेळोवेळी तसेच भविष्यात ज्या अटी शर्ती विहित करीत त्याही गिरणीवर बंधनकारक राहतील.

३. सदर पुनर्वसन कर्ज शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-२१९३/ प्र.क्र.१८३/टेक्स-१, दिनांक ११.८.१९९३ व सूतगि-११९७/ प्र.क्र.१९३/ टेक्स-१, दि. २४.३.१९९९ व शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सूतगि ३३१६/प्र.क्र.८१/टेक्स-१ (अ), दि.१०.७.२०१७ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती तसेच शासकीय भाग भांडवलासंदर्भात शासनाने भविष्यात आणखी काही अटी व शर्ती निश्चित केल्यास अशा अतिरिक्त अटी व शर्ती सदर सूतगिरणीस लागू राहतील या मुद्दयाच्या अधीन राहून तसेच खाली नमूद केलेल्या अतिरिक्त अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे. याबाबत संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी खातरजमा करावी.

१) वीर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा या सूतगिरणीस शासनाने यापूर्वी रु.२२.२४ लाख बिनव्याजी कर्ज मंजूर केले आहे. त्याची परतफेड सूतगिरणीने केली नसल्याने सदर थकित बिनव्याजी कर्जाची रक्कम रु.२२.२४ लाख इतकी रक्कम या आदेशान्वये प्राप्त होणारी पुनर्वसन कर्जाची रु.१,२१,६६,०००/- या रक्कमेतून बिनव्याजी कर्जाची एकरकमी परतफेड म्हणून भरणा करणे बंधनकारक राहील.

संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांनी या आदेशान्वये वीर जगदेवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा या सूतगिरणीस प्राप्त होणारी पुनर्वसन कर्जाची रक्कम रु.१,१२,६६,०००/- या रक्कमेतून सूतगिरणीकडून थकित बिनव्याजी कर्जाच्या रक्कम रु.२२,२४,०००/- इतक्या रक्कमेची परतफेड करुन घ्यावी. जोपर्यंत सूतगिरणी बिनव्याजी कर्जाची एकरकमी परतफेड करीत नाही, तोपर्यंत सदर रक्कम इतर कोणत्याही कारणास्तव सूतगिरणी खर्च करणार नाही यावर नियंत्रण ठेवावे व संबंधित बॅकेच्या शाखा व्यवस्थापक यांना त्यानुसार सूचना देण्यात याव्यात. तसेच शासकीय भाग भांडवलाची व बिनव्याजी कर्जाची परतफेड विहित वेळेत गिरणीमार्फत होईल यासाठी आवश्यक असलेली सर्व दक्षता संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी घ्यावी .

२) सदर सूतगिरणींच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन त्याबाबतच्या प्रगतीचा तिमाही अहवाल संचालक वस्त्रोद्योग यांनी विहित विवरणपत्रात शासनास सादर करावा.

३) प्रस्तुत गिरण्यां संदर्भात शासन निर्णयामधील तरतुदीनुसार वसुलीबाबत काटेकोरपणे कार्यवाही संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांनी करावी.

४) संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांनी पुढील ३ महिन्यांत सदर सूतगिरणीच्या विद्यमान संचालक मंडळाकडून, प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत होणाऱ्या रक्कम रु.१,२१,६६,०००/- इतक्या रकमेच्या २०% इतक्या वैयक्तिक मत्तेचे तारण मिळवावे. जोपर्यंत असे वैयक्तिक तारण प्राप्त होणार नाही, तोपर्यंत प्रस्तुत वितरीत रक्कम गिरणीस खर्च करता येणार नाही तसेच तोपर्यंत या आदेशाद्वारे मंजूर केलेल्या रकमेवर सूतगिरणीस अधिकर्ष (overdraft) काढून रक्कम खर्च करता येणार नाही असे बंधन संचालक वस्त्रोद्योग यांनी संबंधित बँकेवर घालावे. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी काटेकोरपणे व तातडीने कार्यवाही करावी.

५) प्रस्तुत सूतगिरणींच्या संचालक मंडळाची निवडणूक झाल्यास, नवनियुक्त संचालक मंडळास ३ महिन्यांच्या आत वैयक्तिक मालमत्तेचे तारण द्यावे लागेल. नवनियुक्त संचालक मंडळाने असे तारण

दिल्यानंतरच पूर्वीच्या संचालक मंडळाचे वैयक्तिक तारण मुक्त करण्यात येईल अशी सुधारणा संस्थेच्या Bye-Laws मध्ये करण्याची कार्यवाही संचालक वस्त्रोद्योग यांनी करावी.

६) सूतगिरणींच्या प्रकल्पास मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाच्या Financial Closer चा पुरावा शासनास सादर केल्याशिवाय शासनाचा हिस्सा देता येणार नाही. त्यामुळे त्याबाबतची खात्री संचालक वस्त्रोद्योग यांनी करुन घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी.

७) प्रस्तुत सूतगिरणींकडे बँकेत जमा असलेल्या निधीचे नियोजन करुन कार्यक्षमतेने विनियोग करीत असल्याची खात्री संचालक वस्त्रोद्योग यांनी करावी.

८) प्रस्तुत सूतगिरणींने कर्जाची उचल करुन त्याचा विनियोग प्रकल्प उभारणीसाठी करुन लवकर प्रकल्प पूर्ण करावा. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण ठेवावे.

९) प्रकल्प अहवालातील अनुज्ञेय तरतुदीपेक्षा त्या त्या बाबीवर होणारा जास्तीचा खर्च गिरणी स्वनिधीतून करील या अटीवर शासकीय भागभांडवल मंजूर करण्यात येत आहे याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी तशी कार्यवाही करावी.

१०) सदर सहकारी सूतगिरण्यांच्या खरेदीबाबत खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे अदा करावी. निविदेमध्ये विवक्षित तरतूद असल्याशिवाय पुरवठादारास अग्रीम अदा करण्यात येऊ नये याबबात संचालक वस्त्रोद्योग यांनी खात्री करावी.

११) गिरणीस प्राप्त झालेल्या भागभांडवलाचा तसेच गिरणीकडे शिल्लक असलेल्या रकमेचा गिरणी योग्य प्रकारे विनियोग करते किंवा नाही याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण ठेवावे.

१२) सूतगिरणीने भांडवली वस्तु खरेदी करण्यापूर्वी यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची यथास्थित नोंद Dead Stock रजिस्टर मध्ये घेण्यात यावी. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण करावे.

१३) प्रस्तुत गिरणीने खरेदी केलेल्या वस्तू प्रत्यक्ष प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना देयक अदा करावे. याबाबत संचालक वस्त्रोद्योग यांनी नियंत्रण करावे.

१४) खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी.

१५) सूतगिरणीची उभारणी विहित कालमर्यादेत पूर्ण करावी.

१६) सहकारी सूतगिण्यांवर शासकीय अधिकारी नेमण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन असून याबाबतचा अंतिम निर्णय सर्व सूतगिरण्यांना बंधनकारक राहील.

१७) सदर सूतगिरणीने स्वबळावर उत्पादन सुरु करावे.

१८) मा.न्यायालयातील सूतगिरणीच्या कामगारांचा प्रश्न सोडवण्याच्या अटींवर सदरील पुनर्वसन कर्ज मंजूर करण्यात येत आहे.

१९) संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांनी या आदेशान्वये वितरीत होणरी रक्कम इतर कोणत्याही कारणास्तव खर्च करणार नाही यावर नियंत्रण ठेवावे व संबंधित बॅकेच्या शाखा व्यवस्थापक यांना त्यानुसार सूचना देण्यात याव्यात. तसेच शासकीय भाग भांडवलाची, पुनर्वसन कर्ज व बिनव्याजी कर्जाची परतफेड विहित वेळेत गिरणीमार्फत होईल यासाठी आवश्यक असलेली सर्व दक्षता संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी घ्यावी.

४. या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेल्या पुनर्वसन कर्जाची रक्कम रु.१,२१,६६,०००/- (रुपये एक कोटी एकवीस लाख सहासष्ट हजार फक्त) इतकी रक्कम वीर जगदेवराव कापूस उत्पदक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा या सहकारी सूतगिरणींच्या दि मलकापूर अर्बन को.ऑप बँक लि, मलकापूर, जि.बुलढाणा शाखा मलकापूर येथील चालू खाते क्र.०००१११०१०००००००००५७४, IFSC Coad :HDFC0CTMUCB मध्ये RTGS द्वारे जमा करावी.

५. या सूतगिरणीस मिळालेले पुनर्वसन कर्ज (अर्थसहाय्य) हे गिरणीचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठीच उपयोगात आणणे संस्थेवर बंधनकारक राहील. या अर्थसहाय्याचा दुरुपयोग केल्यास, संस्थेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व संस्थेला दिलेले अर्थसहाय्य एकरकमी वसूल करण्यात येईल. तसेच अशा प्रकरणी संबंधित संचालक मंडळास व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

६. वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.४.२०१७ अन्वये, “३२-अंशदाने” या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ पैकी ११, १२, १३, १६, १७ व १८ मधील तरतूदी या प्रकरणी लागू नाहीत. परिच्छेद ७अ, ७ब, ७क, ८, ९, १०, १४ व १५ मधील तरतूदी या प्रकरणी लागू असून सदर तरतुदींची सदर प्रकरणी खालीलप्रमाणे पूर्तता होत आहे.

(७अ) एखाद्या योजनेस / प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे:- या सूतगिरणीचा सहाव्या पंचवार्षिक योजनेत शासन अर्थसहाय्यासाठी समावेश करण्यात आला आहे. तसेच सूतगिरणीच्या प्रकल्प अहवालास रज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात आली आहे.

७ब) नियतव्यय उपलब्धता:- सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद १०.२) मध्ये नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली नियतव्यय अर्थसंकल्पित आहे.

७क) व ८) विभागास प्रदान वित्तीय अधिकार:- वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.४.२०१७ अन्वये "५५ कर्जे व अग्रिम" या बाबीखालील खर्च करण्यास विभागास वित्तीय अधिकार प्राप्त आहेत.

९) पूर्वी खर्च केलेल्या अनुदानाबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे:- वीर जगदेवराव कापूस उत्पदक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा या सुतगिरणींचे लेखापरिक्षण सन २०१४ पर्यंत झाले असून त्यानुसार सूतगिरणीने यापूर्वी प्राप्त झालेल्या पुनर्वसन कर्ज, शासकीय भाग भांडवलाच्या अनुषंगाने ३०.६.२०१४ अखेर प्रकल्पाच्या उभारणीवर रु.८८४.२३ लाख खर्च केले असल्याबाबत संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी त्यांच्या संदर्भाधीन क्र.५ येथील दि.१८.३.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

१०) संक्षिप्त देयक प्रलंबितता:- सदर लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक तपशीलवार देयक सादर करण्यासाठी प्रलंबित नाही.

१४) बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्रशासकीय / तांत्रिक मान्यता:- सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीबाबत राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते.

१५) कार्यालयीन खरेदीसाठीची कार्यपद्धती:- खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी.

तसेच वित्त विभागाच्या दिनांक १८.४.२०१७ च्या शासन निर्णयातील तपासणी सूचीतील अ.क्र. ८ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे.

७. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद- ब मधील २) नुसार, वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ च्या परिशिष्टातील अनु. क्र. १, २, ४, ५, ६ व ७ या प्रकरणी लागू नसल्याने व परिशिष्टातील अ.क्र. ३ बाबत नमूद करण्यात येते की, सदर योजना ही नियमित स्वरुपाची राज्य योजनांतर्गत योजना असल्याने तसेच योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत नसल्याने व "५५ - कर्जे व अग्रिम" या बाबीखाली शासकीय भाग भांडवलाचे वितरण सदर प्रकरणी करीत असल्याने नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

८. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण - २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद- ब मधील ३) नुसार, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ सोबतच्या परिशिष्टातील अनु. क्र. ३ मधील तरतुदी विचारात घेता योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत नसल्याने नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही.

९. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद-ब मधील ३ नुसार, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.४.२०१७ सोबतच्या परिशिष्टातील अनु. क्र. ८ संदर्भातील तपासणी सुचीमधील या प्रकरणी लागू असलेल्या मुद्दयांची पूर्तता होत आहे.

१०. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दिनांक १० मे, २०१६ मधील परिच्छेद- अ) नुसार प्रस्तुत प्रकरणाची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार:- वित्त विभाग, परिपत्रक क्र.अर्थसं- २०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.४.२०१७ अन्वये “५५- कर्जे व अग्रिम” या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पूर्तता होत आहे.

२) मंजूर निधी:- सन २०१७-१८ मध्ये सहकारी गिरण्यांना शासकीय भागभांडवल या योजनेअंतर्गत मागणी क्र.व्ही-५, लेखाशीर्ष ६४२५ सहकारासाठी कर्जे- (०४) सहकारी सूत गिरण्यां (०४) (०३) सहकारी सूत गिरण्यांचे पुनर्वसन - सहकारी सूत गिरण्यांना कर्जे (६४२५ ०२१५), ५५ कर्जे व आगाऊ रकमा या खाली रु.८००.०० लाख इतकी तरतूद अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी दि.१८.४.२०१७ च्या परिपत्रकानुसार ८०% म्हणजे रु.६४०.००लाख इतकी तरतूद उपलब्ध आहे. सदर अर्थसंकल्पित निधीपैकी सन २०१७-१८ मध्ये अद्याप कोणताही खर्च झालेला नाही.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे:- सदर सूतगिरणीन ३०.६.२०१४ अखेर प्रकल्पाच्या उभारणीवर रु.८८४.२३ लाख खर्च केले असल्याबाबत संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी त्यांच्या संदर्भाधीन क्र.५ येथील दि.१८.३.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यांत येत आहे, त्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही:- या योजनेखाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे:- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे:- लागू नाही.

७) बांधकाम विषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा:- सूतगिरणीच्या स्थापत्य बांधकामाच्या निविदांना मंजूरी देण्यासाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीची मान्यता घेऊनच सूत गिरणीने बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदी करणे बंधनकारक आहे.

८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत:- सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीबाबत राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते.

९) खरेदी विषयक प्रक्रिया संबंधित अद्यावत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा:- याबाबतचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे.

१०) साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरीत करावी:- याबाबतचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे.

११. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रु.१,२१,६६,०००/- (रुपये एक कोटी एकवीस लाख सहासष्ट हजार फक्त) इतक्या पुनर्वसन कर्जाचा खर्च "मागणी क्रमांक - क्र.व्ही-५, लेखाशीर्ष ६४२५ सहकारासाठी कर्जे- (०४) सहकारी सूत गिरण्यां (०४) (०३) सहकारी सूत गिरण्यांचे पुनर्वसन - सहकारी सूत गिरण्यांना कर्जे (६४२५ ०२१५), ५५ कर्जे व आगाऊ रकमा या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

१२. या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेली रु.१,२१,६६,०००/- (रुपये एक कोटी एकवीस लाख सहासष्ट हजार फक्त) इतकी पुनर्वसन कर्जाची रक्कम वीर जगदेवराव कापूस उत्पदक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा या सहकारी सूतगिरणींच्या नावाने अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन सूतगिरणीच्या दि मलकापूर अर्बन को.ऑप बँक लि, मलकापूर, जि.बुलढाण शाखा मलकापूर येथील चालू खाते क्र.०००१११०१०००००००५७४, IFSC Coad :HDFC०CTMUCB मध्ये RTGS द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करण्याकरीता श्री. र. गं. बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार,

मुंबई - ४०० ०३२ यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, श्री. ब. बा. चव्हाण, सह सचिव (सूतगिरणी), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२ यांना "नियंत्रण अधिकारी"म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१३. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८.४.२०१७ अन्वये विभागास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०८१७१६०९३१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-op Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d942896ce3233edb83a20c38834c19f2e3793, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2018.02.08 17:24:26 +05'30'

(विशाल मदने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
३. अपर मुख्य सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (४ प्रतींसह), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अवर सचिव, १७-स/कार्यासन अधिकारी,१६-स, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
६. वित्त विभाग, व्यय-२ / अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-३२.
७. नियोजन विभाग, कार्यासन-१४३१, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०.प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, नागपूर
११.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा
१२.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१३.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

१४.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (२ प्रती),

१५.कार्यकारी संचालक, दि मलकापूर अर्बन को.ऑप.बँक लि, मलकापूर, शाखा मलकापूर, जि.बुलढाणा

१६.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, वकील हाऊस, मुंबई

१७.चेअरमन, वीर जगदेरवराव कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी मर्या, मलकापूर, जि.बुलढाणा

१८. निवडनस्ती (टेक्स १-अ).

सहपत्र : शासन निर्णय क्रमांक : पुकर्ज २११५/प्र.क्र.३५/टेक्स-१(अ), दि. ०८ फेब्रुवारी, २०१८

परिशिष्ट - एक

१) शासनाने सूत गिरणीस ज्या उद्देशासाठी कर्ज मंजूर कलेले आहे, त्या उद्देशांच्या पूर्तीसाठी सर्व कर्जाचा विनियोग करावा.

२) कर्जाच्या विनियोगाचा बाबवार तपशिल कर्जाची रक्कम मिळाल्यापासून ३ महिन्याचे आत प्रमाणपत्रासह सादर करावा.

३) मंजूर केलेल्या कर्जाचा दुरुपयोग केल्याचे आढळून आल्यास सदरहू कर्ज त्यावरील व्याजासहित एकमुक्त वसूल करण्यात येईल.

४) निर्दिष्ट केलेल्या उद्देशाशिवाय इतर बाबींसाठी कर्जाच्या रक्कमेचा विनियोग करावयाचा असल्यास, त्यासाठी शासनाची, हातमाग संचालनालयाची पूर्व परवानगी घ्यावी.

५) सदर कर्जावर वितरणाच्या तारीखेपासून १३% प्रमाणे व्याज आकारले जाईल.

६) गिरणीचे उत्पादन सुरु असल्यास सदरच्या कर्जाची, संस्थेने, प्रत्यक्ष कर्ज मंजूर केलेल्या तारखेपासून १ वर्षानंतर, पाच समान वार्षिक हप्त्यात, त्यावरील व्याजासह, परतफेड करावी.

७) गिरणीचे उत्पादन कर्ज वितरणाचे वेळी बंद असल्यास, गिरणीचे उत्पादन पूर्ववत सुरु झाल्याचे तारखेपासून, एक वर्षानंतर, प्रतिवर्षी एक याप्रमाणे सदर कर्जाची परतफेड, त्यावरील व्याजासह, पाच वार्षिक समान हप्त्यांत करावी. त्यानंतर कर्ज अगर व्याज भरण्यास संस्थेने कसूर केल्यास, कसूर केलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष रक्कमा भरणा केलेल्या तारखेपर्यत १८% प्रमाणे दंडव्याज भरावे लागेल.

८) उत्पादनांत असलेल्या संस्थेने कर्ज अगर व्याज भरण्यात कसूर केल्यास, प्रत्यक्ष भरणा करण्यांत कसूर केलेल्या तारखेपासून, प्रत्यक्ष भरणा केलेल्या तारखेपर्यंत, प्रतिशत १८% प्रमाणे दंडव्याज भरावे लागेल.

९) संस्थेने जवळच्या कोषांगारात कर्जाचे हप्ते खालील अर्थशीर्षाखाली भरावे.
“उपशीर्ष वर्गीकरण" “६९८-सहकारासाठी कर्ज (जे) सहकारी कताई गिरण्या संगणक संकेतांक (६९८-५३९-५)”

१०) कर्जावरील व्याज खालील अर्थशीर्षाखाली जमा करावे :-
“मुख्य शीर्ष ९४९- व्याज सहकारी संस्थांकडून मिळालेले व्याज (दहा) सहकारी कताई गिरण्या, संगणक संकेतांक (०४९-९९४-३)”

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-op Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d9428966ce3233edb83a20c38834c19f2e3793, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2018.02.08 17:25:45 +05'30'

(विशाल मदने)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

*****